
# ई-वेबिणार
# ''कोरोनामुळे विध्यार्थावरील मानसिक ताण व उपाय''

दि.२५ जुलै २०२० रोजी शनिवार ला महाविध्यालयात जीवनविद्या मिशन व कै.कु.दुर्गा.क.बनमेरू विज्ञान महाविध्यालय लोणार यांच्या संयुक्त विध्यमाने एक दिवशीय ई-वेबिणार चे आयोजन''कोरोनामुळे विध्यार्थावरील मानसिक ताण व उपाय'' या विषयावर आयोजन करण्यात आले होते.यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून आदरणीय प्रल्हाद वामनराव पै (स्व.वामनराव पै.यांचे चिरंजीव जीवनविद्या मिशन मुंबई) यांनी मार्गदर्शन केल.तर प्रमुख उद्घाटक म्हणुन मा. डॉ.दिनेश सातंगे संचालक विद्यार्थी विकास विभाग संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती हे होते.कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रकाश बनमेरू सर हे होते.डॉ.प्रकाश बनमेरू सर यांनी आपल्या प्रास्ताविकात या राष्ट्रीय वेबिनारचा उद्देश स्पष्ट केला.यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यी आज कोरोनामुळे शिक्षणापासून,महाविद्यालयापासुन,दुरस्त झाले असुन सततच्या कोरोना या रोगाचा वाढता उद्रेक या परिस्थिती मुळे त्यांचे मानसिक संतुलन खालावत चालले आहे.त्यातच परीक्ष्या व पुढील शिक्षणअश्या अनेक समस्या विध्यार्थी यांच्या सामोर आहेत.यासाठी आम्ही या वेबिनारचे आयोजन करीत आहोत असे ते म्हणाले. यानंतर प्रमुख उद्घाटक डॉ.दिनेश सातंगे यांनी विद्यार्थ्यांनी कोनत्याही प्रकारे खचुन न जाता आहे या परिस्थितीला सामोरे जात आपन आपले ज्ञान वाढवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे .सध्या आपल्या विद्यापिठामार्फत विवीध ऑनलाईन कोर्सेस चालु आहे यामध्ये आपण सहभागी होऊन आपल्या ज्ञानामध्ये भर टाकु शकता असे ते म्हणाले.यांनतर आदरणीय दादा उर्फ प्रल्हाद वामनराव पै यांनी आपल्या प्रमुख मार्गदर्शनात आपण जगाची परिस्थिती बदलू शकत नाही पण या कोरोणामूळे उद्धवलेल्या परिस्थितीचा परिणाम आपल्यावर होऊ न देणे आपल्या हातात आहे. सध्या नैराश्य हा खूप मोठा प्रश्न निर्माण झाला असून मानसिक आरोग्य चांगले ठेवणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी सध्या मिळत असलेल्या वेळेचा सदुपयोग करायला हवा. परीक्षा होतील किंवा नाही याचा विचार न करता ज्ञान मिळवत राहून स्वतःची प्रगती करत राहावे. कोणत्याही क्षेत्रात काम करताना आपला हेतू चांगला व मोठा असावा तसेच देशहिताचा असावा असे त्यांनी सांगितले. आपले विचार नेहमी चांगले व सकारात्मक असावे व व्यापक विचार करून सर्वांचे भले व्हावे असा असावा आशावाद ठेवावा. आपल्याला मदत व मार्गदर्शन करणाऱ्या विषयी आपण कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे असे त्यांनी सांगितले.

सदर वेबिनार हा झुम या ऑनलाईन □पवर व युट्युब लाईव्ह करण्यात आला होता.यामध्ये जवळपास एक हजार लोकांनी नोंदणी करून ३२५ सहभागी यांनी ऑनलाईन बघीतला.सदर वेबिनारचे सुत्रसंचालन या कार्यक्रमाचे समंन्वयक प्रा.शिवशंर मोरे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा.सौरभ गायकवाड यांनी केले.यामध्ये डॉ.सुर्यकांत बोरूळ, प्रा.कमलाकर वाव्हळ,यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला.तसेच जीवनविद्या मिशनचे सदस्य मा.श्री.अनिल राठी,या.श्री.विष्णु सरोदे,सौ.पुजा पवार यांचे मोलाचे सहकार्य लाभले.




अमृत सेवाभावी संस्था परभणी संचालित

**कै.कु.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालय,**
**लोणार ता.लोणार जि.बुलडाणा ४४३३०२**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

*एक दिवशीय राष्ट्रीय वेबिणार*


**"कोरोणामुळे विध्यार्थ्यावरील मानसिक ताण"**

शनिवार दि. २५ जुलै २०२०, वेळ :- सकाळी ११.०० वा

**वेबिणार कार्यक्रमपत्रिका**


| अ.क्रं | कार्यक्रम | प्राध्यापक/मार्गादर्शकाचे नाव | वेळ |
|---|---|---|---|
| १ | Technical Test | प्रा.सौरभ गायकवाड,प्रा.डॉ.महेंद्र भिसे,प्रा.रामेश्वर देव्हडे. | 10.55-11.00 |
| २ | सूत्रसंचालन | प्रा.शिवशंकर मोरे | 11.00-11.05 |
| ३ | प्रास्ताविक | प्राचार्य,डॉ.प्रकाश बनमेरू | 11.05-11.15 |
| ४ | उद्घाटक परिचय | प्रा.कमलाकर वाव्हळ | 11.15-11.20 |
| ५ | प्रमुख उद्घाटक परिचय | डॉ.दिनेश सातंगे (संचालक,विद्यार्थी विकास विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती) | 11.20-11.25 |
| ६ | प्रमुख मार्गदर्शक परिचय | डॉ.सुर्यकांत बोरूळ | 11.25-11.35 |
| ७ | मार्गदर्शन | मा.प्रल्हाद वामनराव पै.(दादा) (B.Tech.IIT Powai, MBA,Jamanlal Bajaj Mumbai TQM,Japan) युवा मार्गदर्शक, आजीवन विश्वस्त जीवन विद्या मिशन मुंबई. | 11.35-12.55 |
| ८ | आभार प्रदर्शन | प्रा.सौरभ गायकवाड | 12.55-1.00 |


**वेबिणार कार्यक्रम पत्रिका व लीफलेट**






सदर फोटोमध्ये महाविध्यालायचे प्राचार्य डॉ.प्रकाश बनमेरू सर,डॉ.दिनेस सातंगे सर, (संचालक,विद्यार्थी विकास विभाग सं.गा.बा.अ.वि.) प्रमुख मार्गदर्शक मा.प्रल्हाद पै दादा,सौ.पुजा पवार,तसेच महाविध्यायातील प्राध्यापक डॉ.बोरूळ सर,प्रा.शिवशंकर मोरे,प्रा.देव्हडे ई.




वेबिणार मध्ये प्रास्ताविक मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ.प्रकाश बनमेरू सर तर प्रमुख मार्गार्दर्शन करतांना मा.प्रल्हाद पै दादा व सदर कार्याक्रमाचे लाईव्ह युटूब प्रक्षेपण.

संमिश्र

पुण्यनगरी ३

# परीक्षा होतील किंवा नाही याचा विचार न करता ज्ञान वाढवत रहा : प्रल्हाद पै

## बनमेरु महाविद्यालयात 'मानसिक ताण व उपाय' विषयावर राष्ट्रीय वेबिनार



लोणार, दि. २७ (प्रतिनिधी)

आपण जगाची परिस्थिती बदलवू शकत नसलोतरी कोरोनाचा परिणाम आपल्यावर होऊ न देणे आपल्या हाती आहे. परीक्षा होतील किंवा नाही याचा विचार करू नका. आपले ज्ञान वाढवत राहा. खचून न जाता परिस्थितीला सामोरे गेले तर नक्कीच यशस्वी होऊन प्रगती साधता येते, असे प्रतिपादन प्रल्हाद पै यांनी येथे केले.

येथील कै.कु. दुर्गा बनमेरू विज्ञान महाविद्यालयात 'कोरोनामुळे विद्यार्थ्यांवरील मानसिक ताण आणि उपाय' या विषयावर महाविद्यालय व जीवनविद्या मिशन, मुंबई यांच्या वतीन २५ जुलै रोजी एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनार पार पडले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. उद्घाटन अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. दिनेश सातंगे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रल्हाद पै म्हणाले, सध्या नैराश्य हा खूप मोठा प्रश्न निर्माण झाला असून मानसिक आरोग्य चांगले ठेवणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी सध्या मिळत असलेल्या वेळेचा सदुपयोग करायला हवा. परीक्षा होतील किंवा नाही याचा विचार न करता ज्ञान मिळवत राहून स्वतःची प्रगती करत राहावे. कोणत्याही क्षेत्रात काम करताना आपला हेतू चांगला, मोठा तसेच देशहिताचा असावा. आपले विचार नेहमी चांगले व सकारात्मक असावे. व्यापक विचार करून सर्वांचे भले व्हावे असा असावा आशावाद ठेवावा. आपल्याला मदत व मार्गदर्शन करणाऱ्यांविषयी आपण कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे, असेही ते म्हणाले. प्राचार्य डॉ. प्रकाश बनमेरू यांनी आपल्या प्रास्ताविकात या राष्ट्रीय वेबिनारचा उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थी आज कोरोनामुळे शिक्षण, महाविद्यालयापासून दूर झाले आहेत. गंभीर परिस्थितीमुळे त्यांचे मानसिक संतुलन खालावत चालले आहे, यासाठी वेबिनारचे आयोजन केल्याचे ते म्हणाले.

### ३२५ जणांचा सहभाग

वेबिनार झुम ॲप व यू-ट्युबवर लाईव्ह करण्यात आला. यामध्ये एक हजार लोकांनी नोंदणी केली. प्रत्यक्षात ३२५ जणांनी सहभागी होऊन तो ऑनलाइन पाहिला. सूत्रसंचालन कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. शिवशंकर मोरे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. सौरभ गायकवाड यांनी केले. डॉ. सुर्यकांत बोरूळ, प्रा. कमलाकर वाव्हळ यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. जीवनविद्या मिशनचे सदस्य अनिल राठी, विष्णू सरोदे, पूजा पवार यांचे सहकार्य लाभले.

CS Scanned with CamScanner

दै.पुण्य-नगरी या व्रुतपत्रात सदर कार्यक्रमाची बातमी.

| समन्वयक | प्राचार्य |
|---|---|
| स.प्रा.शिवशंकर मोरे | डॉ.प्रकाश क.बनमेरू |